महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय बीड
जिल्हा शासकिय रुग्णालयाजवळ बार्शी रोड बीड -४३११२२

फोन : ०४२४२-२२२०१४, फॅक्स : ०२४४२-२२१३३३ ई-मेल : sp.beed@mahapolice.gov.in

जा.क्र.आस्था-प्रली/पो. भरती-२०२२-२३/चारित्र पडताळणी/२०२४/ 493 बीड दिनांक ०३/०९/२०२४

**विषय :-** चालक पोलीस शिपाई भरती-२०२२-२०२३.
वैद्यकीय तपासणी फॉर्म भरुन देणे व वैद्यकीय तपासणी साठी हजर राहणे बाबत.

*****

उपरोक्त विषयान्वये कळविण्यांत येते की, बीड जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील चालक पोलीस शिपाई पदाच्या रिक्त ०५ पदांसाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रलि-आस्था/पो.भरती२०२२-२३/अंतिम निवड यादी/२०२४/१०४४३ दिनांक ०२/९/२०२४ अन्वये अंतिम निवड यादी व अंतिम प्रतिक्षा यादी प्रकाशित करण्यांत आलेली आहे.

नमुद अंतिम निवड यादी मध्ये समाविष्ठ असलेल्या उमेदवार यांना पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यापूर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ तसेच, शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदी नुसार वैद्यकीय चाचणी करणे आवश्यक असल्यामुळे अंतिम निवड यादी मध्ये समाविष्ठ असलेल्या सर्व उमेदवार यांनी वैद्यकीय तपासणी फॉर्म भरुन देणेसाठी दिनांक ०४/९/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. पोलीस अधीक्षक, कार्यालय बीड येथे हजर राहावे. **अंतिम प्रतिक्षा यादीवरील उमेदवार यांनी हजर राहू नये.**

**( अविनाश बारगळ )**
पोलीस अधीक्षक,बीड.

प्रति,
पोलीस निरीक्षक, सायबर.
२/- सदरचे पत्र बीड पोलीस या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यांत यावे.

Scanned with OKEN Scanner